पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अमरावती ■ वर्ष १ ■ अंक ३० ■ बुधवार, दि. २४ जून २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

■ RNI No.- MHAR/26/A2977 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# राज्यासह विदर्भात पावसाची हजेरी !

## अनुकूल हवामानामुळे मान्सूनची प्रगती...

प्रतिनिधी २४ जून

**पुणे :** मान्सूनने सलग दुसऱ्या दिवशी प्रगती करत मंगळवारी मुंबईसह संपूर्ण कोकण विभाग व्यापला. दुसरीकडे मराठवाड्याचा बहुतांश भाग व्यापत मोसमी पावसाने विदर्भातही प्रवेश केला. अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा, अमरावती जिल्ह्यात दरमदार हजेरी लावली आहे. या पावसाने शेतकरी सुखावला असून, आणखी पाऊस पडल्यास पेरण्यांना प्रारंभ होणार आहे. सध्या हवामान अनुकूल असल्याने पुढील दोन दिवसांत मान्सूनची आणखी प्रगती अपेक्षित असून, येत्या आठवड्यात कोकणात सर्वदूर पावसाचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) वर्तविला आहे.

अरबी समुद्रावर मोसमी वाऱ्यांना जोर आल्यामुळे मान्सूनने मंगळवारी अलिबागच्या पुढे वाटचाल करत मुंबईसह कोकणाचा उर्वरित भाग व्यापला. दुसरीकडे, मध्य महाराष्ट्रातील नाशिक, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर आणि विदर्भातील वर्ध्यापर्यंत मान्सूनने मजल मारली. उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातही अनेक ठिकाणी दुपारनंतर विजांसह पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. 'आयएमडी'च्या अंदाजानुसार, कोकण आणि गोव्यात २७ ते २९ जूनदरम्यान; तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात २४ ते २६ जूनदरम्यान काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.

दरम्यान, पावसाने आणखी दमदार हजेरी लावण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असली, तरी आज सकाळपासून सुरू असलेल्या पावसाने शेतकरी सुखावल्याचे दिसून येते.



### कोयना पाणलोट क्षेत्रात पावसाची संततधार

सकाळपासून कोयना पाणलोट क्षेत्रासह तालुक्यात पावसाने संततधार चालू केली आहे. सकाळी आठपासून पावसाने सुरुवात केली. सायंकाळनंतर पावसाने दमदार हजेरी लावली. पाणलोट क्षेत्रातील कोयना, नवजा व महाबळेश्वर या ठिकाणी सरासरी ५० टक्केपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. पाणलोट क्षेत्रातील कोयना ६१, नवजा ५२, तर महाबळेश्वर येथे ४३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. एक जून ते आजअखेर एकूण कोयना ९६, नवजा १३९, महाबळेश्वर ८० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

### विदर्भातील बळीराजा सुखावला

मंगळवारी दुपारपासून अकोल्यासह यवतमाळ, बुलडाणा, वाशिम, अमरावती जिल्ह्यात पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे बळीराजा सुखावला आहे. आज सकाळपासूनही काही भागात व राज्यात पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले आहे. वळवाच्या पावसाने हुलकावणी दिल्याने गेली महिनाभर प्रतीक्षेत असणाऱ्या शेतकऱ्यांना रिमझिम पडणाऱ्या पावसामुळे दिलासा मिळाला. शेतकऱ्यांनी पेरणीची तयारी पूर्ण केली असून, दमदार पावसाची वाट आता शेतकरी पाहात आहेत.

## उद्धवसेनेला आजच दिल्लीत बोलावले!

**नवी दिल्ली :** 'ऑपरेशन टायगर' अंतर्गत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिंदेसेनेने ठाकरेंकडील ६ खासदार गळाला लावले. परंतु अद्याप लोकसभा अध्यक्षांकडून या फुटीर गटाच्या विलीनीकरणाला मान्यता देणारी कुठलीही माहिती प्रसारित करण्यात आली नाही. त्यात आज दिल्लीत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी उद्धवसेनेच्या नेत्यांना भेटीसाठी बोलावले आहे. संध्याकाळी ५ वाजता उद्धवसेनेचे गटनेते लोकसभा अध्यक्षांची भेट घेणार आहेत.



## आरआरसी समूहाकडून श्रींच्या पालखीचे स्वागत!

दोन दिवसांपासून अकोल्यात श्रींच्या पालखीचे आगमन झाले असून, संपूर्ण शहरच श्रींच्या भक्तीमध्ये तल्लीन झाले आहे. ठिकठिकाणी श्रींच्या पालखीचे स्वागत करण्यात येत आहे. मंगळवारी दुपारी श्रींची पालखी ७०० वारकऱ्यांसह गांधी रोडवरून जात असताना आरआरसी समूहाच्यावतीने या पालखीचे व्यवस्थापक प्रसाद पिसोळकर यांनी पूजन केले. यावेळी आरआरसी समूहाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात ; डॉक्टर दाम्पत्याचा करुण अंत

प्रतिनिधी २४ जून

**बुलढाणा :** भरधाव कार समोरील ट्रकला मागून जोरात धडकल्याने झालेल्या भीषण अपघातात छत्रपती संभाजीनगर येथील डॉक्टर दाम्पत्याचा मृत्यू झाला तर मुलामुलीसह चालक गंभीर जखमी झाला.

समृद्धी महामार्गाच्या मुंबई कॉरिडोरवर चॅनल क्रमांक ३२६.५ वर दुसरबीड-किनगाव राजादरम्यान मंगळवारी सकाळी सहा वाजताच्या सुमारास ही दुर्घटना घडली.

डॉ. सय्यद असिफ सय्यद उमर (वय ५२) व डॉ. गुलसिताबी सय्यद असिफ (वय ४५) यांचा या अपघातात जागीच मृत्यू झाला. तसेच मुलगी सबा सय्यद असिफ (वय १८), मुलगा सय्यद अजबमाज सय्यद असिफ (वय २५) व चालक शेख साजिद शेख फरीद हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथे उपचार सुरू आहेत. डॉक्टर दाम्पत्य छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी होते. सिंदखेड राजा तालुक्यातील किनगाव राजा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मुंबई कॉरिडोरवरील चॅनल क्रमांक ३२६.५ येथून एमएच २०-एचएन ६७६८ क्रमांकाची फॉर्च्यूनर कार मुंबईच्या दिशेने जात होती. कारचा वेग अधिक होता. चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही कार समोरील एनएल ०१ एडी ४९८१ क्रमांकाच्या मालवाहू ट्रकला पाठीमागून जोरात धडकली.

## वीज कोसळून तिघांचा मृत्यू; दोघे जखमी

प्रतिनिधी २४ जून

**यवतमाळ :** जिल्ह्यात मंगळवारी झालेल्या जोरदार पावसासह विजांच्या कडकडाटामुळे दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर दोघेजण जखमी झाले आहेत. या घटनांमुळे कळंब व उमरखेड तालुक्यांत हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, हवामान विभागाने यवतमाळ जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जारी केला असून पुढील काही तासांत मेघगर्जनेसह पावसाचा इशारा दिला आहे.

कळंब तालुक्यातील उमरी येथे दुपारी सुमारे चार वाजताच्या सुमारास शेतात काम सुरू असताना अचानक वीज कोसळली. या दुर्घटनेत भीमराव रामभाऊ लाटकर (५५) व निखिल वाल्मिक भोयर (३२) यांचा जागीच मृत्यू झाला. तर साहील भीमराव लाटकर (२०) हा गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी यवतमाळ येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले. दुसरी घटना उमरखेड तालुक्यातील कुरळी भोजनगर तांडा येथे घडली. येथे वीज पडल्याने महेश गणेश आडे (२५) यांचा मृत्यू झाला. त्यांच्या सोबत असलेले काळू कनीराम पवार हे जखमी झाले असून त्यांच्यावर पुसद येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## २७ जूनला उद्धव ठाकरे यांची यवतमाळात जाहीर सभा

**यवतमाळ :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय देशमुख यांनी नुकताच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर यवतमाळ जिल्ह्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने संघटना बळकट करण्यासाठी कंबर कसली असून, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची २७ जून रोजी यवतमाळ येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.









# अवतरलासी भूवर जढमुढ तारा या...





*अकोला : विठ्ठल माऊलीच्या दर्शनासाठी निघालेल्या शेगावच्या संत गजानन महाराज पालखी सोहळ्याचा दुसरा दिवसही भाविकांच्या उत्साह, श्रद्धा आणि भक्तिभावाने भारलेला होता. शहरातील प्रमुख परिसरात असलेल्या मांगीलाल बाजोरिया प्रांगण येथे पहाटे माऊलींच्या पालखीचे विधिवत पूजन व आरती मोठ्या भक्तिभावात झाली. बुधवारी सकाळी ६ वाजता टाळ-मृदंगाच्या गजरात, 'विठ्ठल विठ्ठल'च्या जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात पालखी पुढील मार्गक्रमणासाठी मार्गस्थ झाली. जिल्हाधिकारी निवासस्थान, बिरसा मुंडा चौक, नेहरू पार्क, गौरक्षण रोड, इन्कम टॅक्स चौक मार्गे पालखी आदर्श विद्यालय (शाळा क्र. १६) येथे दुपारच्या विश्रांतीसाठी थांबली.*

*या ठिकाणी शहरातील विविध भागांतून तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून माऊलींचे दर्शन घेतले. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.*

त्यानंतर सायंकाळी पालखी सिंधी कॅम्प चौक, अशोक वाटिका, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, सिटी कोतवाली, जयहिंद चौक, राजराजेश्वर मंदिर, किल्ला चौक, हरिहर पेठ व हरिहर मंदिर मार्गे पुढे जात रात्रीच्या मुक्कामासाठी जि.प. टाउन शाळेत पोहोचेल. पालखी मार्गावर पोलिसांचा चोख बंदोबस्त; एकनिष्ठेने बजावली सेवा

श्री संत गजानन महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या हजारो भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस प्रशासनाने पालखी मार्गावर तसेच विश्रांती स्थळांवर चोख बंदोबस्त तैनात केला होता. श्रींच्या पालखी सोहळ्यात कोणतीही अनुचित घटना घडू नये आणि भाविकांना दर्शनाचा लाभ सुरळीतपणे घेता यावा यासाठी पोलिस यंत्रणा सतर्क होती. पालखी मार्गावर तसेच दर्शनस्थळी उसळलेल्या जनसागराच्या पार्श्वभूमीवर पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उन्हाची तमा न बाळगता आणि पावसातही एकनिष्ठेने आपली सेवा बजावली. श्रींच्या सेवेसाठी मिळालेली संधी हे आपले भाग्य असल्याची भावना मनात ठेवून पोलिस कर्मचाऱ्यांनी कर्तव्य पार पाडले.

**आरआरसी नेटवर्कचे थेट प्रक्षेपण**
दरवर्षी प्रमाणे याही वर्षी आरआरसी नेटवर्कने थेट प्रक्षेपण करून घरबसल्या महाराजांचे दर्शन करविले. तसेच सोशल मीडियाच्या द्वारे लाईव्ह प्रसारणाने देश विदेशातील भाविकांनी सुद्धा दर्शनाचा लाभ घेऊन आरआरसीला धन्यवाद दिले.

शहरातून पालखीचे भ्रमण सुरू असताना वाहतुकीत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी वाहतूक व्यवस्थेचे प्रभावी नियोजन करण्यात आले होते. कोतवाली पोलिस ठाणे, जुने शहर पोलिस ठाणे, वाहतूक शाखा तसेच इतर विभागांतील अधिकारी व कर्मचारी विविध ठिकाणी तैनात होते.

भाविकांची सुरक्षा, शिस्तबद्ध दर्शन व्यवस्था आणि सुरळीत वाहतूक यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली. पालखी मार्गावरील स्वच्छता, शिस्त आणि सुरक्षा यांचे उत्तम नियोजन झाल्याने श्रींचा पालखी सोहळा शांततापूर्ण, सुरक्षित आणि भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला.
पालखी मार्गाची झाडून स्वच्छता करून दिली सेवा

दरवर्षीप्रमाणे यंदाही हा श्री संत गजानन महाराज पालखी सोहळ्याचा पर्वा पर काही श्रीं भक्तां कडून पालखी मार्ग स्वच्छ व निर्मळ ठेवण्यासाठी शहरातील मुख्य पालखी मार्गावर झाडू व खराट्यांच्या साहाय्याने स्वच्छता मोहीम राबवून आपली सेवा दिली. निर्मय बनो आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद धुमाळे, सुनील झाडोकार, दिनेश माईंडोकार यांच्यासह अनेक कार्यकर्ते व भाविकांनी या उपक्रमात सहभाग देत भक्तीबरोबरच सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.


छाया : दीपक शर्मा









## मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांना ऑनलाइन प्रशिक्षण

प्रतिनिधी २४ जून

**बुलढाणा :** भारत निवडणूक आयोगाने मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण (एजर्म्ंत घ्हूहेग्न ्निंग्दह - एर्ृ) कार्यक्रमाची घोषणा केली आहे. या मोहिमेअंतर्गत मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी नव्याने पात्र ठरणाऱ्या मतदारांचा समावेश, स्थलांतरित व मयत मतदारांची नोंद अद्ययावत करणे तसेच प्रत्येक मतदाराची माहिती पडताळून पाहण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यानुसार २० जून ते २९ जून २०२६ या कालावधीत तयारी, प्रशिक्षण तसेच हिंर्ल्सूग्दह इदेस् छपाईची प्रक्रिया राबविण्यात येत आहे.



या कार्यक्रमाच्या अनुषंगाने पी. एम. साने (्थ्श्ऊ) यांच्या मार्गदर्शनाखाली बुलढाणा जिल्ह्यात एर्ृ कामकाजासाठी नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथील जिजाऊ सभागृहात व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित महत्त्वाचे अधिकारी ऑनलाइन सहभागी झाले होते. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी सुधिर खांदे, उपजिल्हाधिकारी अजिंक्य घोडके, उपविभागीय अधिकारी सुहासिनी गोनेवार, उपविभागीय अधिकारी जयश्री ठाकरे, तहसीलदार वृशाली केसकर, तहसीलदार संजीवनी मुपडे आदी उपस्थित होते.

या प्रशिक्षणामध्ये मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण प्रभावीपणे पार पाडण्यासाठी बीएलओ यांनी नवीन मतदार, स्थलांतरित मतदार तसेच मयत मतदार यांचे अर्ज कशाप्रकारे भरून घ्यावेत, त्यांची अचूक नोंद कशी करावी आणि पडताळणी प्रक्रिया कशाप्रकारे राबवावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेदरम्यान प्रत्येक पात्र मतदाराचा समावेश होईल.

## महापालिकेच्या बेघर निवासस्थानात लाखोंचा घोळ?

◆ काँग्रेस नगरसेवक आझाद खान यांचा आरोप

प्रतिनिधी २४ जून

**अकोला :** दिनदयाळ अंत्योदय योजनेत बांधलेल्या राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानात बेघरांतील नागरिकांसाठी दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधा, जेवण आणि त्याच बरोबर येथील देखभाल दुरुस्तीत मोठा घोटाळा झाल्याचा आरोप आज काँग्रेस नगरसेवक आझाद खान यांनी महासभेत केला.

काँग्रेस नगरसेवक आझाद खान यांनी बेघर नागरिकांना योग्य ते पोषण भत्ता मिळावा. त्यांच्या हक्कावर कोणी गदा आणू नये साठीचा हा लढा आहे. गरिबांच्या ताटातील कोणी अन्न ओढून घेऊ नये यासाठी आझाद खान यांनी अतिशय तळमळीने हा मुद्दा महासभेत उपस्थित केला. इतकेच नाही तर त्यांनी स्वतः या बेघर निवासस्थानाला भेट देत सर्व



नगरसेवकांनी या ठिकाणी जाण्याची गरज व्यक्त केली. ज्यांना कोणी नाही त्यांच्यासाठीची ही सोय चांगली आहे. पण, त्यात होत असलेल्या भ्रष्टाचार हा लाखो रुपयांमध्ये असल्याचा गंभीर आरोप काँग्रेस नगरसेवक आझाद खान यांनी केला आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी करत गरिबांना न्याय द्या अशी मागणी त्यांनी केली. लाखो रुपयांच्या या घोटाळ्याची चौकशी करण्याची गंभीर मागणी आझाद खान यांनी केली आहे. या प्रकरणात निविदा प्रक्रियेला का बायपास केले आणि खरोखर इतके लोक तिथे राहतात काय हा संशोधनाचा विषय आहे.

## ओपन स्पेस घोटाळ्यात सागर भारुका यांचे बेछूट आरोप; एक हजार कोटींचा ओपन स्पेस घोटाळा?

**अकोला :** महापालिकेत नेहमी चर्चेत राहणारे शिवसेना नगरसेवक सागर भारुका यांनी महासभेत मोठा धमाका केला. त्यांनी थेट आयुक्तांवर गंभीर आरोप करत त्याची कागद पत्रेच दाखविली. त्यामुळे सभागृह पुर्णवेळ स्तब्ध होते. भूमि अभिलेख विभागातील निलंबित अधिकारी आणि महापालिकेतील अधिकाऱ्यांनी हा ओपन स्पेस घोटाळा केल्याचा आरोप सागर भारुका



यांनी केला. सागर भारुका यांनी ज्या जमीनीचा उल्लेख केला ती कधी सरकारी होती. कधी ती खाजगी होती. तर पुन्हा ती कशी सरकारी झाली. यात मोठ्या प्रमाणात अधिकाऱ्यांनी अर्थात आयुक्त व महापालिका कर्मचाऱ्यांनी हेराफेरी केल्याचा आरोप आपण आत्ताच पाहिला. या विषयीचे कागद पत्रेच शिवसेना नगरसेवक सागर भारुका यांनी आर आर सी न्यूजला दाखविले. त्याच बरोबर सागर भारुका यांनी आर आर सी न्यूज ने ओपन स्पेस घोटाळा जनतेसमोर आणल्यानंतर त्यांना ही कागदपत्रे मिळाल्याचा दावा केला आहे.

## 'सुपर ५०' साठी गुरुवारी परीक्षा

**यवतमाळ :** २०६२ विद्यार्थी; १० परीक्षा केंद्र ऑफलाईन पद्धतीने होणार परीक्षा जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थ्यांना जेईई आणि एनईईटी (नीट) परीक्षांचे मोफत प्रशिक्षण देण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'सुपर ५०' उपक्रमांतर्गत २०६२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून या विद्यार्थ्यांची निवड परीक्षा गुरुवारी दि. २५ जून रोजी दुपारी १२ ते २ या वेळेतच घेतली जाणार आहे. या परिक्षेसाठी जिल्ह्यात १० परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले असून त्यानुसार यवतमाळ येथे ४ व पुसद, उमरखेड, दारव्हा, वणी, राळेगाव आणि पांढरकवडा या ठिकाणी प्रत्येकी एक अशा १० परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा पार पडणार आहे. त्यामध्ये यवतमाळ येथील रमाबाई आंबेडकर विद्यालय, विवेकानंद विद्यालय, राणी लक्ष्मीबाई विद्यालय आणि जि. प. माध्यमिक शाळा गोधणी रोड हे परीक्षा केंद्र आहेत.

## 15 दिवसांचे ऑफलाईन प्रशिक्षण, अधिकृत प्रमाणपत्र आणि रोजगारक्षम कौशल्य विकासाची संधी

प्रतिनिधी २४ जून

**यवतमाळ :** महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था 'अमृत' यांच्या वतीने विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, भावनिक सक्षमीकरण आणि समुपदेशन सेवा अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने 'अमृत मानसमित्र' समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत १५ दिवसांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण, अधिकृत प्रमाणपत्र, क्षेत्रीय कार्याचा अनुभव आणि रोजगारक्षम कौशल्य विकासाची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे ही राज्य शासनाची अग्रगण्य संस्था तांत्रिक व शैक्षणिक भागीदार म्हणून कार्यरत राहणार आहे. मानसिक आरोग्य, विद्यार्थी समुपदेशन, भावनिक आधार, संवाद कौशल्ये, सक्रिय श्रवण, सहानुभूतीपूर्ण प्रतिसाद, संकट व्यवस्थापन, जीवनकौशल्ये आणि मानससामाजिक सहाय्य या विषयांवर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पुणे येथे १५ दिवसांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार असून त्यामध्ये परस्परसंवादी सत्रे, प्रकरणांचा अभ्यास, प्रात्यक्षिक उपक्रम आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जाईल. त्यानंतर एक महिन्याचा क्षेत्रीय अनुभव कालावधी राहणार असून सहभागी उमेदवारांना जिल्हास्तरावर शाळा अथवा महाविद्यालयांशी जोडण्यात येणार आहे. पुढील तीन ते पाच महिन्यांपर्यंत नियमित मार्गदर्शन, पर्यवेक्षण, अडचणींचे निराकरण आणि व्यावसायिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना अमृत आणि महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्थेचे संयुक्त अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. तसेच मानसिक आरोग्य क्षेत्रात कार्य करण्याची संधी, सामाजिक संस्थांमधील रोजगाराच्या संधी आणि व्यावसायिक संपर्क वाढविण्याची संधीही उपलब्ध होणार आहे.

एम.ए./एम.एस्सी. मानसशास्त्र, एम.ए./एम.एस्सी. समुपदेशन मानसशास्त्र तसेच सामाजिक कार्य विषयातील पदव्युत्तर पदवीधारक (एमएसडब्ल्यू) उमेदवार अर्ज करू शकतात. संबंधित क्षेत्रातील अनुभवी उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार आहे.

हे प्रशिक्षण पात्र उमेदवारांसाठी पूर्णपणे मोफत असले तरी निवास, भोजन व राहण्याचा खर्च उमेदवारांना स्वतः करावा लागणार आहे. इच्छुकांनी सर्व आवश्यक कागदपत्रांसह र्स्र्स्र्ू.दु.ग्ह या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावा. पहिल्या प्रशिक्षण तुकडीसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २९ जून २०२६ आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याच्या वाढत्या गरजा लक्षात घेता प्रशिक्षित समुपदेशकांची आवश्यकता पूर्वीपेक्षा अधिक असल्याचे मत महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्थेचे डॉ. कापसे यांनी व्यक्त केले असून, मानसिक आरोग्य क्षेत्रात अर्थपूर्ण करिअर घडवू इच्छुक युवक-युवतींसाठी हा उपक्रम सुवर्णसंधी असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.अशी माहिती जिल्हा व्यवस्थापक, अमृत, यवतमाळ यांनी दिली.

## 'स्वाधार' योजनेतील त्रृटी पूर्ण करण्यासाठी ७ जुलैपर्यंत मुदतवाढ

**अमरावती :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या, परंतु कागदपत्रातील त्रुटींमुळे कार्यालयस्तरावर प्रलंबित असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी दि. ७ जुलैपर्यंत त्रृटी पूर्ण कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

राज्य शासनाने शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील अकरावी, बारावी, तसेच बारावीनंतरच्या व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधांसाठी थेट आर्थिक मदत देण्यासाठी 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' सुरू केली आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत, त्यांच्यापैकी काही अर्ज कागदपत्रातील कमतरतेमुळे कार्यालयात प्रलंबित आहेत. या प्रलंबित विद्यार्थ्यांची यादी कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आली आहे. कार्यालयाकडून वेळोवेळी सूचना देऊनही अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप त्रृटी पूर्तता केलेली नाही, ज्यामुळे त्यांचे अर्ज प्रलंबित आहेत.

विद्यार्थ्यांचे अर्ज त्रृटींमुळे प्रलंबित आहेत, त्यांनी शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रे कार्यालयात संबंधित शाखेकडे जमा करावीत. या मुदतीत त्रृटी पूर्ण केली नसल्यास, याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थी विद्यार्थ्यांची राहणार आहे. तसेच दि. १६ जून ते ७ जुलै २०२६ या कालावधीत दुपारी ३ ते ५ यावेळेत स्वत: उपस्थित राहून त्रृटी पूर्तता करून घेण्यासाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, अमरावती येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

त्रृटी पुर्ततेबाबत अधिक माहितीसाठी समाज कल्याण कार्यालय किंवा दुरध्वनी क्र. ०७२१-२६६१२६१ वर संपर्क साधावा, असे आवाहन आर. व्ही. जाधवर यांनी केले आहे.

सिटी न्यूज अमरावती

बुधवार, दि.२४ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## ‘मोदी सरकारची १२ वर्षे’ महा-अभियान: खा. डॉ. अनिल बोंडे यांच्या मार्गदर्शनात डॉक्टरांशी संवाद, केंद्र सरकारच्या आरोग्य योजनांवर चर्चा

**अमरावती :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या यशस्वी आणि दूरदर्शी नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या ऐतिहासिक कामगिरीला १२ वर्षे पूर्ण झाली आहेत. या निमित्ताने भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशभरात विशेष महा-अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत अमरावती येथे भाजपचे ज्येष्ठ नेते तथा खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनात वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद साधून केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली. या महा-अभियानाचे 'महाराष्ट्र प्रदेश सहसंयोजक' आणि खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या नेतृत्वाखालील टीमने अमरावती येथील प्रसिद्ध 'श्रीकृष्ण आरोग्यम' हॉस्पिटलला भेट दिली.

# समतेचा आणि भक्तीचा वारसा जपणाऱ्या रुख्मिणी मातेच्या पालखीचे अंबानगरीत जल्लोषात स्वागत

प्रतिनिधी २४ जून

**अमरावती :** श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे आषाढी एकादशी सोहळ्यासाठी प्रस्थान करणाऱ्या माता रुख्मिणीच्या पवित्र पालखीचे अंबानगरीतील बियाणी चौकात माजी आमदार ॲड. यशोमती ठाकूर तसेच खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. सर्वधर्मीय नागरिक, वारकरी, भाविक आणि मान्यवरांच्या उपस्थितीमुळे हा स्वागत सोहळा सामाजिक एकात्मतेचा आणि समतेचा संदेश देणारा ठरला.

श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथून श्रीक्षेत्र पंढरपूर येथे आषाढी वारीसाठी जाणाऱ्या रुख्मिणी मातेच्या पालखीची यंदाची ४३२ वी परंपरागत वारी भक्तिमय वातावरणात पार पडत आहे. अनेक शतकांपासून अखंड सुरू असलेली ही परंपरा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभवाचे प्रतीक मानली जाते.

रुख्मिणी मातेच्या पालखीला श्रीक्षेत्र पंढरपूर येथे मानाचे स्थान प्राप्त व्हावे तसेच शासकीय पूजनाचा सन्मान मिळावा यासाठी माजी आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून आज रुख्मिणी मातेच्या पालखीला पंढरपूर येथे मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे अमरावती शहरात पालखी आगमनानंतर बियाणी चौकात स्वागत करण्याची परंपराही त्यांनीच सुरू केली असून ती आजही अविरतपणे सुरू आहे.

### माजी आमदार ॲड. यशोमती ठाकूर व खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते स्वागत



**बियाणी चौकात भक्तीरसाला उधाण**

सायंकाळी पालखीचे बियाणी चौकात आगमन होताच टाळ-मृदंगाच्या गजरात, ‘ज्ञानोबा-तुकाराम’ आणि ‘जय जय रुख्मिणी माते’ च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. पालखीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. वारकऱ्यांच्या मुखी विठ्ठलनाम आणि वातावरणात भक्तीचा दरवळ असा मंगलमय सोहळा अनुभवण्यास मिळाला.

**माजी आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांचा वारकऱ्यांसोबत भक्तिभावाचा सहभाग**

पालखी स्वागत सोहळ्यानंतर माजी आमदार ?ड. यशोमती ठाकूर यांनी वारकऱ्यांसोबत फुगडी खेळत भक्तिरसात सहभागी होत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी त्यांनी काही अंतरापर्यंत पालखी खांद्यावर घेत वारकरी परंपरेप्रती असलेली आपली निष्ठा आणि श्रद्धा व्यक्त केली.

**सर्वधर्मसमभावाचे दर्शन घडविणारा सोहळा**

तिवसा विधानसभा मतदारसंघातील तसेच अमरावती शहर व ग्रामीण भागातील विविध समाजघटकांचे नागरिक, वारकरी, प्रतिष्ठित व्यक्ती आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्व धर्म, पंथ आणि समाजातील नागरिकांच्या सहभागामुळे हा सोहळा सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश देणारा ठरला.

डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या या स्वागत सोहळ्याला खासदार बळवंत वानखडे, अमरावती काँग्रेस जिल्हाध्यक्ष बब्लूभाऊ देशमुख , माजी आमदार वीरेंद्रभाऊ जगताप, माजी महापौर विलास इंगोले, बबलू शेखावत, अनिल अग्रवाल,

शहर पोलीस आयुक्त राकेश ओला, निवासी जिल्हाधिकारी संतोष काकडे, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, अमरावती पोलिस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, अमरावती कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरिष मोरे, सुरेश रतावा, संजय शिरभाते, जयंतराव देशमुख, अभय देशमुख, श्याम बेलसरे, श्रीकांत बोंडे, गजानन देशमुख, मुकद्दर पठान, दिलीप सोनोने, नाना नागमोते, अविनाश भडांगे, महेश राऊत, विनोद वानखडे, शरद वानखडे, मुकुंद पुणसे, पंकज देशमुख,संदीप आमले, संजय चौधरी, अभिजीत बोके, जितेंद्र ठाकूर, शैलेष काळबांडे, प्रतिभाताई गौरखेडे, अनिकेत देशमुख, वैभव वानखडे, रितेश पांडव, वीरेंद्र भट, किशोर चांगोले, सतीश पोजगे, रवी हांडे, संजय मार्डीकर, संजय कळसकर, सचिन ठोके, सुनील जुनघरे, प्रणव गौरखेडे, नरू विघ्ने, अंजली ठाकरे आदी मान्यवर सहकुटुंब उपस्थित होते. तसेच शहरातील भाविकही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळावर विठ्ठल नामाचा गजर

प्रतिनिधी २४ जून

### माहुली ( धांडे ) पालखीचे पर्यावरण संदेशासह पंढरपूरकडे प्रस्थान

**दर्यापूर :** सालाबादाप्रमाणे यंदाही तालुक्यातील माहुली ( धांडे ) येथील भक्त मंडळी द्वारे गाव ते पंढरपूर पालखी दिंडीचा शुभारंभ झाला . श्री नारायणगुरु महाराज मंदीर पूजनानंतर गावातून वाजगाजत निघाल्या नंतर आपल्या पाच वर्षांच्या परंपरे नुसार गाव शिवारात स्थापीत गाडगेबाबा गोरक्षण संस्थेच्या विशाल परिसरात सर्व भक्त मंडळी तथा संस्थेच्या गो सेवकांनी गोपूजन करून एकत्रित वृक्षारोपण केले . या वेळी सर्व उपस्थितांद्वारे केल्या गेलेल्या श्री विठ्ठल नामाच्या गजराने संपूर्ण गोरक्षण परीसर दणाणून गेला . पर्यावरण या विश्व सेवेचा संदेश देत या दिंडीने संस्थेद्वारे आयोजित अल्पोउपहार ग्रहण करून




सुप्रसिद्ध शिंगणापूर काळा मारोती संस्थानकडे प्रवासाने प्रस्थान केले . पालखीचे पूजन गोरक्षण संस्थेचे कार्यकारिणी उपाध्यक्ष विजय पाटील धुमाळे ( साखरे ) यांनी केले . संस्थेचे व्यवस्थापक बाळासाहेब ( अनिल ) नामदेवराव भारसाकळे यांचा पालखी संचाद्वारे श्रीधरजी धांडे यांनी दैनंदीन गोसेवेबद्दल पालखीचा नारळ - दुपट्टा अर्पण करून गौरव केला . शेकडो पुरुष व महिला सहभागी असलेल्या या पालखीतील भक्तांच्या यथोचित अल्पोउपहार सेवा कार्यात वैभव ठाकरे, संदीप पवार ,आशिष ठाकरे, संतोष गवई, ज्ञानेश्वर गवई, अंकुश घरडे, श्रीकृष्ण पोटे यांचेसह संस्थेचे विश्वस्त प्रा गजानन भारसाकळे यांनीही सेवा दिली . श्री विठ्ठल दिंडी पालखी स्वागत परपंरा कायम राखल्या बद्दल संपूर्ण माहुली ( धांडे ) ग्राम वासियांनी गोरक्षण संस्थेचे आभार व्यक्त केले .

# अमरावती ग्रामीण पोलीस दलातर्फे जागतिक योग दिन उत्साहात साजरा.!

**अमरावती :** अमरावती ग्रामीण पोलीस घटका तर्फे जागतिक योग दिनानिमित्त २१ जुन २०२६ रोजी सकाळी ०६/०० वा. ते ०७/३० वा. दरम्यान जोग स्टेडियम, पोलीस मुख्यालय, अमरावती येथे जागतिक योग दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर जागतिक योग दिनास निकेतन कदम पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण व दत्ता तोटेवाड, अपर पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी पोलीस अधीक्षक यांनी योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व अधोरेखित करून सर्व अधिकारी व अंमलदारांनी नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले. योगामुळे शरीर



सुदृढ राहण्याबरोबरच मानसिक तणाव कमी होऊन कार्यक्षमता वाढते, असे त्यांनी मार्गदर्शनपर मनोगतात व्यक्त केले. सदर जागतिक योग दिनास योगाभ्यास करण्यासाठी सपोउपनि मोहन भारसाकळे, ब. नं. ११४६ नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती ग्रामीण यांनी योगाचे प्रशिक्षण दिले.

# आ. संजय खोडके यांनी पावसाळी अधिवेशनात तालिका सभापती म्हणून सांभाळले कामकाज

**अमरावती :** राज्यविधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधान परिषदेतील कामकाजा दरम्यान पीठासीन सभापती राम शिंदे यांच्या अनुपस्थितीत तालिका सभापती म्हणून आ.संजय खोडके यांनी सभागृह चालविले. यावेळी सत्ताधारी पक्षाच्या वतीने आणलेल्या महाराष्ट्र विधान परिषद नियम २६० च्या प्रस्तावावर चर्चा सुरु असतांना पीठासीन तालिका सभापती संजय खोडके यांनी आपल्या संसदीय कामकाजाचा परिचय देऊन तब्बल दोन तास चांगल्या तऱ्हेने विधान परिषदेतील कामकाज चालविले.

महाराष्ट्र विधान परिषदेत सत्ताधारी पक्षाने नियम २६० नुसार



महत्त्वाच्या सार्वजनिक मुद्द्यांवर चर्चेचा प्रस्ताव मांडण्यात आला. यावेळी सभागृहातील सदस्यांनी शेतकरी विकासाबरोबरच दुष्काळजन्य परिस्थिती, कर्जमाफी, विविध कृषी योजना , जलसंधारण अशा विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. हि चर्चा अत्यंत महत्वपूर्ण असतांना तालिका सभाध्यक्ष म्हणून विराजमान आमदार संजय खोडके यांनी तब्बल दोन तास चांगल्या तऱ्हेने सभागृह चालविले. त्यांनी नियोजित वेळेत

**- सभागृह चालवितांना संसदीय अनुभव , शिस्त , संयम व सद्द्विवेक बुद्धीचा देखील घडवून दिला प्रत्यय**

प्रत्येक सदस्यांना बोलण्याची संधी दिली. तसेच सत्ताधारी सदस्यांबरोबरच विरोधी बाकावर बसलेल्या आमदारांचे सुद्धा म्हणणे ऐकून घेतले. सभागृहाचे कामकाज चालवीत असतांना तालिका सभाध्यक्ष आ. संजय खोडके यांनी आपल्या संसदीय कामकाजाचा परिचय देऊन अनुभव , शिस्त , संयम व सद्द्विवेक बुद्धीचा देखील प्रत्यय घडवून दिला. आ,संजय खोडके यांना विधान परिषदेमध्ये पीठासीन तालिका सभापती म्हणून पाहतांना अमरावतीकरांचे हृदय अभिमानाने भारावले होते.

# अमृत मानस मित्र मोफत प्रशिक्षण कार्यक्रमासाठी २९ जूनपर्यंत अर्ज करा

**अमरावती:** विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, भावनिक सक्षमीकरण आणि समुपदेशन सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था ’अमृत’ (AMRUT) च्या वतीने ’अमृत मानसमित्र’ समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येत आहे.

या अभिनव उपक्रमासाठी ’महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था’ (श्घ्श्प), पुणे ही तांत्रिक व शैक्षणिक भागीदार म्हणून कार्यरत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) नुसार शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या समुपदेशनाची तरतूद असून, कौशल्याधारित शिक्षणावर भर देण्यासाठी हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पहिल्या बॅचसाठी पात्र उमेदवारांना २९ जून २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. अशी माहिती अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली आहे.

या कार्यक्रमांतर्गत निवड झालेल्या अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांना पुणे येथे १५ दिवसांचे मोफत ऑफलाइन प्रशिक्षण दिले जाईल. या अभ्यासक्रमात मानसिक आरोग्य, संवाद कौशल्ये, Active थ्रेूहग्हु, संकट व्यवस्थापन आणि मानस सामाजिक सहाय्य यांसारख्या विषयांवर प्रत्यक्ष कार्यक्षम समुपदेशक विकसित करण्यावर भर दिला जाईल. १५ दिवसांच्या ऑफलाइन सत्रानंतर उमेदवारांना जिल्हा पातळीवरील शाळा किंवा महाविद्यालयाशी जोडून १ महिन्याचे प्रॅक्टिकल फिल्ड एक्सपोजर दिले जाईल. त्यानंतर पुढील ३ ते ५ महिने उमेदवारांना प्रत्यक्ष व्यवसायासाठी श्घ्श्प चे मॉनिटरिंग, मेंटरिंग, नियमित ऑनलाइन सत्र आणि व्यावसायिक सहाय्य पुरवले जाईल. हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना ’अमृत’ व 'MIMH' यांचे संयुक्त अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल, ज्यामुळे त्यांना मानसिक आरोग्य क्षेत्रात तसेच सामाजिक संस्थांमध्ये रोजगार व करिअरच्या विविध सुवर्णसंधी उपलब्ध होतील.

या प्रशिक्षणासाठी एम.ए./एम.एस्सी. मानसशास्त्र, एम.ए./एम.एस्सी. समुपदेशन मानसशास्त्र किंवा मास्टर ऑफ सोशल वर्क (MSW) ही पदव्युत्तर पदवी असलेले उमेदवार पात्र आहेत. या क्षेत्रात पूर्वीपासून अनुभवी असलेल्या उमेदवारांना निवडीत प्राधान्य दिले जाईल. हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत असले, तरी उमेदवारांना निवास, भोजन व राहण्याची व्यवस्था स्वतःच्या खर्चाने करावी लागेल. इच्छुक उमेदवारांनी https://mahaamrut.org.in/ या संकेतस्थळावर सर्व आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज सादर करावा. प्राप्त अर्जांची छाननी करून, ओरिएंटेशन सत्र आणि आवश्यक परीक्षा किंवा मुलाखत घेऊन ’प्रथम येईल.

त्यास प्राधान्य’ या तत्त्वानुसार उमेदवारांची नावे निश्चित केली जातील. मानसिक आरोग्य क्षेत्रात अर्थपूर्ण करिअर घडवू इच्छिणाऱ्या युवक-युवतींनी या सुवर्णसंधीचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन श्घ्श्प पुणे येथील तज्ज्ञ डॉ. कापसे यांनी केले आहे.

# गरिबांची ऑनलाइन फसवणूक करणारे आरोपी गजाआड

प्रतिनिधी २४ जून

### ■ ग्रामीण पोलिसांची कामगिरी, एस पी निकेतन कदम यांनी दिली पत्र परिषदेत माहिती

**अमरावती :** गरिबांची ऑनलाईन फसवणूक व त्यानंतर लाखो रुपये लंपास करणारे आरोपी पोलिसांनी गजाआड केले आहे. यासंदर्भाची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी पत्र परिषद मध्ये आज दिली.

अमरावती जिल्ह्यामध्ये गरीब व मजूर वर्ग यांच्या असाह्यतेचा फायदा घेवून त्यांचे सोबत खोटे बोलून त्यांचेकडून सरकारी योजनेचा फायदा मिळविण्यासाठी बैंकेचे खाते काढण्यासाठी प्रेरीत करुन त्यांच्याकडून बैंकेचे पासबुक, ए.टी.एम. कार्ड, लिंक खात्याचे सिमकार्ड घेवून व त्याबदल्यात त्यांना किरकोळ मोबदला देवून त्यांचे बैंक खाते सायबर फसवणुकीचे गुन्ह्यात वापरण्यात आल्याच्या तक्रारी पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांचेकडे प्राप्त झाल्याने त्याबाबत पोलीस स्टेशन शिरखेड अमरावती ग्रा. येथे अपराध क्रमांक २१६/२०२६ कलम ३१६(२), ३१८(४)भा.न्या.सं. सहकलम ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करुन गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन सायबर अमरावती ग्रामीण यांचेकडे देण्यात येवून तात्काळ मार्गदर्शनात तांत्रीक विश्लेषन करुन आरोपी अटक करुन पुरावे संकलीत करण्यासाठी ०३ पोलीस पथक तयार करण्यात आले.

मजूर वर्ग व गरीब इसम यांना किरकोळ स्वरुपाचा नगदी मोबदला देवून बैंक खाते उघडून त्यासोबत पासबुक, ए.टी.एम. कार्ड, नविन मोबाईल नंबर प्राप्त करुन आधार लिंक करुन त्या खात्यांचा अनाधिकृत ऑनलाईन गेमींगसाठी देशांतर्गत व देशाबाहेर करण्यासाठी वापर करण्यात येतो. नमुद खात्यामध्ये करोडो रूपयांचे आर्थिक व्यवहार होतात.



**आरोपीतांचे ताब्यातून मिळून आलेला मुद्देमाल :-**

| | |
|---|---|
| विवीध बैंकेचे पासबुक | ६४ |
| विविध बैंकेचे ATM कार्ड | १४७ |
| विविध बैंकेच चेकबुक | १९ |
| सिमकार्ड | १९८ |
| मोबाईल हँडसेट | ५२ |
| लॅपटॉप | ९ |
| टॅबलेट | ३ |

**असा एकुण १०,८५,०००/-** मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गुन्हयाचे तांत्रीक विश्लेषन केले असता तसेच मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे गोवा राज्यामध्ये दक्षिण गोवा या भागातील उच्चभ्रू प्रोव्हीडंट अडोरा सोसायटी या ठिकाणी पोलीस निरीक्षक विलासकुमार सानप व पोलीस अंमलदार प्रविण वानखडे, प्रविण अंबाडकर यांनी तांत्रीक माहितीचे आधारे रेड करुन खालील आरोपीतांना अटक करुन त्यांचेकडुन खालील मुद्देमाल जप्त केला. देवचंद बंडूजी मेश्राम वय २६ वर्ष रा अमरावती जि. जामडोल, प्रेम दिलीप खिलारे मुंबई, रार्थ नगरसिध्दा हिंगोली, हसाईराम चाळ. मु., नालासोपारा, अनिकेत सुरेश मस्के रा. कासमपूर., पथ्रोट,योगेश भिमरावजी ईरपाते वय ३१ वर्ष रा तिवसा जहागीरपुर बोर्डा, प्रितम ज्ञानेश्वर इंगळे वय २२ वर्ष रा अमरावती मोर्शी जि. मंगरुळ भिलापूर, आशिषकुमार उमाशंकर चौरसिया वय २५ वर्ष रा अमेठी मुसाफीर खाना जि. मंजेरीया, उत्तरप्रदेश , सत्यम गयाप्रसाद मौर्या वय २२ वर्ष रा- अमेठी राज्य मुसाफीर खाना जि. उत्तरप्रदेश, ,शुभम गयाप्रसाद झारीया वय ३० वर्ष, रा.बडा पथ्थ, जबलपूर, , वैभव कामराज सुर्यवंशी वय २४ र्षा रा- हौशंगाबाद मध्यप्रदेश, ,आदित्य युवराज माळी वय २७ वर्ष राफुटाताल बढाई मोहल्ला, जबलपूर, मध्यप्रदेश ,सुशिल इंदल बर्मन वय २८ वर्ष राल लाईनसिव्ही पावर हाउस जबलपूर, मध्यप्रदेश आदी आरोपी यांना अटक करण्यात आली आहे. आता पर्यंतच्या तपासामध्ये एकुण ०६,२५,००,०००/- रुपयाचे आर्थिक व्यवहार झाल्याचे उघड झाले असुन अधिक तपास सुरु आहे., नमुद गुन्ह्याचे तपासामध्ये एकुण ६४ बैंक खाते मिळून आले असुन सर्व खाते फ्रिज करण्यात आले. , नमूद बैंक खात्याचे अनुषंगाने तपास केला असता त्यामध्ये वेगवेगळ्या राज्यामध्ये ऑनलाईन तक्रारी दाखल आहेत., नमूद गुन्ह्यामध्ये राकेशकुमार झामनानी रा. अमरावती व इतर ०२ आरोपी फरार असुन शोध घेण्यात येत आहे .

**सर्वसामान्य जनतेला आवाहनः-**

गरीब व मजूर वर्गातील लोकांनी किरकोळ स्वरुपाच्या मोबदल्यासाठी गुन्हेगारांच्या प्रलोभनाला बळी न पडता आपले नावावरील बैंक खाते,ऊश कार्ड, आधारकार्ड, मोबाईल नंबर स्वताहाचे नावावर घेवून देउ नये. त्याचबरोबर अनोळखी व्यक्तींनी ध्ऊझ मागीतल्यास देउ नये.

या बैंक खात्यांचा वापर मोठ्या प्रमाणात ऑनलाईन गेमींग, शेअर मार्केट ट्रेडींग, डिजीटल अरेस्ट अशा प्रकारच्या सायबर गुन्ह्यामध्ये वापर होवून रक्कम माठ्या प्रमाणात ट्रान्सफर होते. या होणा-या गुन्ह्यापासुन आपण स्वतहाला सावध ठेवावे.

या दाखल गुन्ह्याचे अनुषंगाने अमरावती ग्रामीण जिल्हा व इतर ठिकाणी कोणीही आपले स्वतहाचे नावाचे बैंक खाते इतर कोणालाही वापरण्यास दिले असतील ते तात्काळ परत घ्यावे व अशा व्यक्तीचे नावे पो.स्टे. सायबर अमरावती हेल्पलाईन क्रमांक ७०३०००६८१९ यावर माहिती देण्यात यावी. असे आव्हाने यावेळी करण्यात आले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ख्रिस्त कॉलनी, ट्रेझरी ऑफिस नजीक, प्रफुल घवळे यांची बिल्डिंग अमरावती, C/0 गॅलक्सी बार जवळ येथे प्रकाशित केले. ■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ **संपर्क** - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A2977, RRC Helpline No. 8484842135